


६० वर्षे
हीरक महोत्सव
साप्ताहिक विवेक
कार्तिक कृ. ६, ५११०, ८ नोव्हेंबर २००९ / २५ रू.



## पुणे उद्योजक विशेषांक

# यशोगाथा उद्योजकांची









# मिसेस जोशीज् अकाऊंटिंग ॲकॅडमी

■■
**जन्मजात शिक्षणाची आणि घरच्या माणसांनी दिलेले प्रोत्साहन यातून रेखा जोशी याची ''मिसेस जोशीज् अकाऊंटिंग ॲकॅडमी '' उभी राहिली. २२ विद्यार्थ्यांना घेऊन एका सोसायटीच्या हॉलमध्ये १९९२ साली व्यवसाय सुरू करून, आज १७०० विद्यार्थी व ३५०० चौरस फुट स्वत:च्य जागेत त्या व्यवसाय करतात. हा सारा प्रवास जिद्दीचा, कष्टाचा तर आहेच, पण आपण आपली संस्था उभी केली हे समाधान मोठे आहे.**
■■

मिसेस जोशीज् अकाऊंटिंग ॲकॅडमी ही पुण्यातील सी.पी.टी., आय.पी.सी.सी. व पायनल या तीनही पायऱ्यांवर शिक्षण घेणाऱ्या सी.ए.च्या विद्यार्थीवर्गाला आपली वाटते. आजच्या 'स्पेशलायझेशन' च्या जमान्यात अकाऊंटिंग या विषयासाठी ॲकॅडमी चालविणाऱ्या त्या पुणेकर एकमेव मराठी महिला असाव्यात.

रेखा जोशी मूळच्या कर्नाटकातील रेखा पटवर्धन. एम.कॉम. पर्यंतचे त्यांचे सारे शिक्षण कर्नाटकात झाले. १९८६ साली लग्न झाल्यावर त्या पुणेकर झाल्या त्यानंतर १९८८ ला त्यांनी एम.फील. केले. काही वर्षे एका महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून त्यांनी नोकरीही केली, पण तेथे फार  काळ त्यांचे मन रमले नाही. एम. कॉम. रँक होल्डर असलेल्या रेखा जोशी यांची मुलगी तीन महिन्यांची असताना सासूबाई व पती विनायक जोशी यांच्या प्रोत्साहनाने १९९१ साली सी. ए. केले पुण्यातून त्या वर्षी पास झालेल्या सी. ए  मध्ये त्या एकमेव महिला होत्या. सी. ए. झाल्यानंतर कायनेटिक होंडा कंपनीतून त्यांना नोकरीची संधी चालून आली होती. मात्र नोकरीत आपण Adjust होऊ शकत नाही हे त्यांचे लक्षात आले होते शिकविण्याची हौस असल्याने शिक्षिका पेशा आपणांस योग्य आहे. याचे भान असल्याने १९९२ साली त्यांनी आपली ॲकॅडमी सुरू केली. जागा घेण्यासाखी परिस्थिती नसल्याने नव्या पेठेत रामबाग सोसयटीचा हॉल घेऊन सहा फोल्डिंग टेबल बनवून, वेळेचे बंधन पाळत दुपारचे दोन-तीन तास त्या वर्ग घेत. त्यांच्या क्लासला पहिल्या वर्षी २२ विद्यार्थी होते. मात्र विद्यार्थीवर्गाचे सहकार्य चांगले होते. त्या बॅचमधील तीन विद्यार्थी मेरीटमध्ये आल्याने रेखाताईंचा उत्साह वाढला. आपण हा व्यवसाय खूप चांगल्या प्रकारे करु शकतो. हा आत्मविश्वास त्यांना आला. कारण शिकवण्याची कला त्यांच्याकडे होतीच.

रामबागेतील क्लास चालू असतानाच नव्या पेठेत इंदुलाल कॉम्पलेक्सचे बांधकाम सुरू होते . ३४० चौरस फुटांची जागा घेणे नक्की केल्यानंतर बॅकेत कर्जासाठी चकरा मारणे सुरु झाले बँक ऑफ इंडिया, लक्ष्मी रोड, पुणे यांनी कर्ज दिल्यावर त्यात आपले दागिने गहाण टाकून त्यांनी रक्कम उभी केली. जागा तयार झाली. जोशीज् अकाऊंटिंग ॲकॅडमीने मागे वळून पाहिले नाही.
आज इंदुलाल कॉम्पलेक्समध्ये ३५०० चौरस फुट जागेत त्यांची ॲकॅडमी चालते व त्यात जवळजवळ १७०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

मिसेस जोशीज् अकाऊंटिंग ॲकॅडमी म्हणजे सी.ए.च्या शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीवर्गाला सी.पी.टी. आय. पी.सी.सी. फायनलपर्यंत अकाऊंटिंग या विषयाची तयारी करून घेणे. आज जोशीज् ॲकॅडमीमधून तीनही स्तरावरील अकाऊंटिंग या विषयाची परिपूर्ण तयारी करून घेतली जाते. त्यासाठी रेखा जोशी स्वत: व दहा जणांचा प्रशिक्षित वर्ग त्यांच्याजवळ आहे. आजचा काळ 'स्पेशलायझेशन'चा

असल्याने या व्यवसायास प्रचंड स्कोप आहे. आजच्या शैक्षणिक रचनेत दहावीला ८० टक्क्यांहून अधिक मार्क मिळविणारा विद्यार्थी कॉमर्स शाखेकडे जातो आहे. साहजिकच सी.ए. होण्याकडे अशा विद्यार्थीवर्गाचा कल आहे. भविष्यात जागतिकीकरनाने, अर्थव्यवस्थेने निराळे वळण घेतल्याने सी.ए.नादेखील प्रचंड प्रमाणात महत्व प्राप्त होणार आहे. इंटरनेट, संगणकीकरण यामुळे जवळ आलेल्या जगात कोठेही व्यवसाय करणे शक्य होणार असल्याने व्यवसायाचा आवाका प्रचंड प्रमाणात वाढला आहे याची जाणीव ठेवून काम करणाऱ्या माणसास स्पर्धा असली तरी मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत असे रेखा जोशी यांना वाटते. आज त्यांच्या ॲकॅडमीत प्रवेशापासून सर्व प्रक्रिया संगणकीकृत आहेत.त्यांच्या संस्थेतून बाहेर पडणारे विद्यार्थी अकाऊंटिंग या विषयात मेरीटमध्ये असतात. आज सकाळी सहापासून रात्री नऊपर्यंत ॲकॅडमी चालू असते. ॲकॅडमी त्यातील शैक्षणिक विभाग रेखा जोशी सांभाळत असतानाच पती विनायक जोशी ॲकॅडमीचे सर्व ॲडमिनिस्ट्रेशन सांभाळतात. त्यांचा स्वत:चा सायबर कॉम डाटा



रेखा जोशी

सिस्टीमचा सॉफ्टवेअरचा व्यवसाय आहे. रेखा जोशी यांना लहानपणापासून चित्रकलेचा खूप छंद होता. मात्र पुढे ते करणे शक्य झाले नाही. तो छंद त्यांची मुलगी गायत्री पुढे नेत आहे. बी.कॉम. झालेली गायत्री ग्राफिक डिझाइन, ॲनिमेशन यावर लक्ष केद्रित करीत आहे. आपल्या शिकवण्याच्या आवडीला रेखा जोशी यांनी व्यवसायिक स्वरुप दिले. व्यावसायिक स्वरुपात स्वत:ला मोल्ड करून घेतले. रात्रंदिवस कष्ट केले. त्यातून 'मिसेस जोशीज् अकाऊंटिंग ॲकॅडमी' उभी राहिली आहे. त्यातून शिक्षण घेऊन बाहेर पडणारा विद्यार्थी अकाऊंटिंग या विषयता पारंगत असनारच हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाहीच. एका महिलेने घरच्या लोकांच्या पाठिंब्याने उभी केलेली ही ॲकॅडमी म्हणून नुसतीच वैशिष्ट्यपूर्ण नाही, तर एक आगळीवेगळी शिक्षण संस्थाच आहे. 'राखावी बहुताची अंतरे, भाग्य येते तद्नंतरे' विद्यार्थीवर्गाचे प्रेम, सहकार्य यामुळेच हे भाग्य आले आहे याची जाणीव ठेवणारी एक यशस्वी शिक्षिका म्हणजे रेखा जोशी.


*With Best compliments from*

PHOEBUS Creations Media Pvt. Ltd.

4th Floor, Nyati Elegance, Above Prithvi Restaurant,
happy Colony, Kothrud Pune - 411038, Ondia
: +91-20-25462583 Mobile : 9890196501
Email : rahul@phonebusmedia.tv
www.phonebusmedia.tv